K. G. Kumbhar.


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67

Special Issue I
January, 2018

ISSN-2250-0383
UGC Approved (Sl. NO. 2630)
Journal No. 48999
IMPACT FACTOR - 0.421

# SHODHANKAN

## STRATEGY OF WAR AND PSYCHOLOGY



- EDITORS -

Dr. Abhimanyu Dhormare
Dr. Ashok Kanade

34

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *


| अ.क्र. | पेपरचे नांव | संशोधकाचे नांव | पांन नंबर |
|---|---|---|---|
| 18 | पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे परराष्ट्र धोरण : भारत आणि चीन संबंध | प्रा.संदिप नामदेवराव मिरे<br>प्रा.डॉ.हरी नारायण जमाले | 102 ते 107 |
| 19 | लष्करी सेवेमध्ये मानसशास्त्राची भुमिका | श्रीमती. सारिका क्षिरसागर | 108 ते 113 |
| 20 | गनिमी कावा – मानसशास्त्रीय युद्धनिती | गडगे शांता रंगनाथ | 114 ते 119 |
| 21 | गनिमी कावा एक मानसशास्त्रीय युद्धतंत्र | प्रा. भोसले सुनिता विठ्ठलराव | 120 ते 124 |
| 22 | मराठा युद्धतंत्र गनिमी कावा याचा शत्रूपरील मानसशास्त्रीय प्रभाव | प्रा. डॉ. तानाजी हातेकर | 125 ते 128 |
| 23 | विविध विचारप्रवाह, बौध्दिक संघर्ष व सामाजिक उन्माद | विक्रांत व्यंकटराव भांके | 129 ते 135 |
| 24 | भातवडी युध्द आणि शहाजीराजे यांचा उदय | डॉ. विनोद सोनवणे | 136 ते 142 |
| 25 | पॅरिस शांतता परीषदेतील प्रमुख नेत्याच्या मनोवैज्ञानिक भुमिकेचे विश्लेषण | प्रा.डॉ.वाय.एस.माहुरे | 143 ते 151 |
| 26 | प्रचार: मानवी बुद्धीला संमोहित करणारे युद्धशस्त्र | प्रा.डॉ.अभिमन्यू ढोरमारे | 152 ते 163 |
| 27 | छत्रपती शिवाजी महाराजांची गनिमीकावा युध्द पध्दती | प्रा.झरेकर रमेश सोनू | 164 ते 170 |
| 28 | मध्ययुगीन बागलाणचे लष्करी महत्त्व | प्रा. संदीप भामरे | 171 ते 174 |
| 29 | भारतीय स्वातंत्र्यलढयातील जहाल मवाळ व क्रांतीकारकांची मानसिकता | सूरेखा काशिनाथ चेमटे | 175 ते 179 |
| 30 | सैनिकी मानसशास्त्र | डॉ.यु.एस.गायकवाड<br>डॉ.एम.डी.कानडे | 180 ते 185 |
| 31 | शिवकालीन युद्धनिती | शितल अरविंद धरम | 186 ते 188 |
| 32 | 21 व्या शतकातील सायबर युध्द: हॅकींग | प्रा. विशाल छबू पोटे | 189 ते 193 |
| 33 | छत्रपती शिवरायाची युध्दनिती व संरक्षण संघटना | डॉ. धम्मपाल रेवण माशाळकर | 194 ते 198 |
| 34 | युध्दजन्य परिस्थिती मध्ये सैनिकांना दिल्या जाणाऱ्या आहाराचा चिकित्सक अभ्यास | दाभाडे वर्षा अंकुशराव | 199 ते 201 |
| 35 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या वक्रयुध्द पध्दतीचे महत्त्व | डॉ.प्रा. राधाकृष्ण जोशी | 202 ते 204 |
| 36 | डॉक्टर व शिक्षक यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास | चिंतामणी सुवर्णा बद्रिनाथ | 205 ते 211 |

ISSN NO. 2250-0383

# मराठा युद्धतंत्र गनिमी कावा याचा शत्रूवरील मानसशास्त्रीय प्रभाव

22

प्रा. डॉ. तानाजी हातेकर
प्रा.किरण कुंभार
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज,
औंध, पुणे–67

## प्रस्तावना

मराठ्यांच्या लष्करी इतिहासात 'गनिमीकावा' या युद्धतंत्राचे खूप महत्त्वाचे स्थान आहे. याच युद्धतंत्राचा अचूक वापर करून छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले, त्याचे रक्षण केले आणि त्याचा विस्तार केला. म्हणूनच आज गनिमी कावा या युद्ध तंत्राचा अभ्यास वेगवेगळ्या सहाय्यकारी शास्त्रांच्या आधारे करून त्याचे महत्त्व व उपयोगिता अधोरेखित केली जाते. मराठ्यांनी महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेन या पद्धतीचा विकास केला.

संदर्भ साधनांच्या उपलब्धते शिवाय इतिहास लिहिता येत नाही आणि मानसशास्त्रीय विश्लेषण केल्याशिवाय गतकाळातील घटनांचा नेमका अर्थ काढता येत नाही उपलब्ध पुराव्यांचे परीक्षण करत असताना संशोधकांना त्यासंदर्भ साधनांचे वेग वेगळ्या मानसशास्त्रीय आणि वैज्ञानिकज्ञान शाखांच्या सिद्धांताचा वापर करावा लागतो म्हणून गतकाळातील युद्धशास्त्राचा आणि युद्धांचा अभ्यास करत असताना मानवशास्त्रीय सिद्धांत आणि मानसशास्त्राचा प्रभाव याची दखल संशोधकास घ्यावी लागते. मराठा युद्धतंत्राचा आणि त्यांच्या पराक्रमाचा शत्रूच्या मानसिकतेवर काय प्रभाव पडला होता याचा शोध घेत असताना तत्कालीन साहित्य कृती तून आणि पत्रव्यवहारातून अनेक संदर्भ निदर्शनास येतात. असाच उमराणीच्या युद्धा दरम्यान मराठ्यांच्या पराक्रमाचा शत्रूवर काय परिणाम जाणवतो याचे वर्णन त्याच वेळी निर्माण झालेल्या मुल्ला नुस्रती? कृत 'तारिखे इस्कंदरी या काव्य ग्रंथात आढळते.

**गनिमीकावा** ''गनिम' हा शब्द मूळ फारशी आहे. मराठ्यांचे शत्रू मराठ्यांसाठी हा शब्दप्रयोग करत असत, तर कावा म्हणजे कपटाने केलेला हल्ला. हा एवढाच मर्यादित अर्थ नाही. कावा या शब्दाचा आणखी एक अर्थ म्हणजे वेगात असणाऱ्या घोडयास



344

वाटेल तसे फिरवते आणि शत्रूलाच कवादेत त्याच्यावर आघाडी घेणे. या डावपेचासाठी प्रशिक्षण आणि याची गरज असे. ''तसेच अचानक छापा घालून शत्रूची माणसे कापून काढणे. शत्रू सावध होण्यापूर्वी पळून जाणे, शत्रूची ठाणी आणि रसद लुटने, प्रदेश जाळून टाकणे यामुळे शत्रूची हाणी जास्त व आपली फार कमी होत असे यामुळे कमी सामर्थ्य असताना ही बलाढ्य शत्रूचा पराभव सहज शक्य होत असे.[2]

## मुल्लानुस्त्र ती आणि तारिखे इस्कंदरी

मुल्लानुस्त्र ती हा विजापूर येथील आदिलशहा राजघराण्यातील आठवा बादशहा अली आदिलशहा याच्या पदरी राजकवी होता. त्याचे तीन ग्रंथउपलब्ध आहेत.

1. तारिखेइस्कंदरी
2. गुल्शनेइश्क
3. अलीनामा

देवी सिंग चौव्हाण यांनी मुल्लानुस्त्र ती याचे दक्खिनी हिंदीतील मूळ पुस्तकाचे हिंदी मध्ये संपादन केले आहे. प्रस्तुत काव्य ग्रंथ हा ऐतिहासिक असून त्यातील माहिती मुळे मराठे–आदिलशहा संबंधावर प्रकाश पडतो तारिखे इस्कंदरी याचा अर्थ 'सिकंदराचा इतिहास' हा काव्यग्रंथ पाच अध्याया मध्ये विभागला असून त्यामध्ये 38 श्लोक आहेत.[3]

## तारिखे इस्कंदरी मधीलवर्णन

या साहित्य कृतीमधून मराठ्यांच्या युद्धतंत्राचा आणि पराक्रमाचा शत्रूवर मानसशास्त्रीय प्रभाव कसा पडला आहे हे दाखविण्यासाठी निवडक काव्यपक्तींचा समावेश केला आहे.

'न छे पेस जांलग पवन कूंम जालवांतल गतिस के घोडयां की चाल।'19

**अनुवाद–**

''ज्या ठिकाणी हवेलाही प्रवेश मिळू शकत नाही तेथे शिवाजीचे घोडे जाऊन पोहचताते.''[4]

''जो जांलग हैच लने कूंचिम्टी की झेल जनमप से उसके हशम काहे खेल।''20



345

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

**अनुवाद–**

'मुग्या जेथ पर्यंत जाऊ शकतात तेथे जाऊन पोहचणे त्याच्या (शिवाजीच्या) खास सैन्याचा नेहमीचा खेळ आहे.'[5]

'सदाती सते दर्या में तरफां दिसे जमीन हस तिस पग तेवी रांदिसे।'23

**अनुवाद–**

'त्यांच्या मुळे समूहात नेहमी तुफान दिसत असे. त्याच्या अपवित्र पावलांमुळे सगळी भूमी निर्मनुष्य झाली होती.'[6]

'दिसे अैन अजल पन देखत न डरे किना मे सकूं बेश अंगे जिवकरे।'50

'रवि शहै अराबे सूंलड तासो धूर ,खदेड पोदुश्मन कूं नांजाए दूर।'51

'कि जोडे पोका बूसू गाडयां कूतर दाट हलेतब बिखरताहै यक दम वो फाट।'52

**अनुवाद–**

(मराठा सैनिकास) समोर मुर्तिमंत मृत्यु दिसत होता. तरीही तो भीत नव्हता. कारणत्याला (प्राणापेक्षा) नाव (कीर्ती) मोठी वाटत असल्यामुळे तो आपले प्राण द्यावयास तयार होतो. (शूर असे समजतात की) जो तोफखान्याशी सामना देईल तोच खरावीर. शत्रूला (मराठ्यास) हाकलून घालवून दिले तरी तो जात नसे. (मात्र) दारू गोळ्याच्या गाड्या सह त्याला ताब्यात घेतले तर ताबडतोब फाटाफूट होऊ न तो फुटून अलग होतो.7

'सिवाका वो लष्कर तो सूर तहराम मगर नस्ल शैतानका या तमाम।57 किपेश (पैस) आते कूकर ने कूपास दिसें फिर यक कैजागे वो दस।'58

**अनुवाद–**

'शिवाजीचे सैन्य अपवित्र भ्रष्ट होते. परंतु ते सैन्य सैतानाच्या कुळातले होते. (कारण) धुसून पुढे येणाऱ्या एका सैनिकाला मारले तर त्याच्या जागी दहा सैनिक दिसत.'[8]

आज जागतिक स्तरावर छ. शिवाजी महाराजांच्या गनिमी कावा युद्ध तंत्राचा अभ्यास केला जातो आणि आधुनिक विविध ग्रंथात गनिमी कावा युद्ध शास्त्राचे महत्व



346

सांगितले जाते. गनिमी कावा युद्ध तंत्राबाबत Psychological Operations in Guerrilla Warfare या ग्रंथात या युद्धतंत्राबाबतपुढीलसंदर्भआढळतो. "The tactical effort in guerrilla Warfare is directed at the Weaknesses of Parallel to a Psychological effort to Weak and destroy enemy Sociopolitical capacity at the same time. In Guerrilla Warfare more than in any other type of military efforts, the psychological activities should be simultaneous with the military ones, in order to achieve the objectives desired."[8]

**निष्कर्ष–**

मुल्लानु स्त्रती शत्रूच्या दरबारातील लेखक असला तरी तो मराठ्यांच्या पराक्रमाची अप्रत्यक्ष कबुली देतो. मराठ्यांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या हालचालींचे वर्णन करताना तो अतिशयोक्ती पूर्ण वर्णन करतो. युद्धातील घडामोडींचे वर्णन करताना युद्धात सहभागी झालेल्या आदिलशाही सैन्याच्या अनुभवातून व त्यांच्या निराशेतून मुल्लानु स्त्रतीचे लिखान घडलेले दिसते व यातूनच शत्रूवर व त्यांच्या लेखकांवर युद्धातील घडामोडींचा मानसशास्त्रीय प्रभाव जाणवतो. सामर्थ्य असूनही मराठ्यांच्या युद्धतंत्रापुढे व पराक्रमा पुढे विजापूरी सैन्य माघार घेते याचे विश्लेषण करताना शत्रूवरील मानसिक दडपण त्यांना आलेली निराशा व संपलेले मनोबल तारिखे इस्कंदरीतून स्पष्टपणे समोर येते.

**संदर्भ**


1. www. wikipedia.org.
2. पवार जयसिंगराव, शिवाजी व शिकाळ, फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, 1997, पृ.क्र.248.
3. चौहान देवी सिंग, दक्खिनी हिंदीतील इतिहास व इतरलेख, इतिहास संशोधन मंडळ, दादर, प्रथमावृत्ती, 1973, पृ.क.77.
4. चौहान देवी सिंग (संपा.), मु. मा. जगताप (अनु.) तारिखे इस्कंदरी, महाराष्ट्र राष्ट्र भाषा सभा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1972, पृ.क्र.40.
5. कित्ता, पृ.क.40.
6. कित्ता, पृ.क.41.
7. कित्ता, पृ.क्र.62.
8. कित्ता, पृ.क्र.76
9. M. George, Psychological Operations in Gaerrilla warfare, A. T. actial manual for the Revolutionary, first published by the central intellige NCE agency. p. 8




347

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ... Pune-67